नियमित फौ. ख. क्र.७७/२०२५
सरकार -वि.- आयुष व इतर
नि.क्र. २८.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - बबन रामचंद्र थुल,
वय ५६ वर्षे, व्यवसाय – मजुरी,
राहणार – सायगाव, ता. भिवापूर, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपींना ओळखतो ते आज कोर्टात हजर आहेत. आरोपी क्र.१ माझा पुतण्या आहे, आरोपी क्र.२ भाऊ आहे व आरोपी क्र.३ माझी वहिणी आहे. घटनेची तारीख मला आठवत नाही. घटना मागच्या वर्षी घडली होती. त्यावेळी आरोपी हे माझ्या घराच्या अंगणातून जात होते तेव्हा मी त्यांना हटकले असता त्यांच्यासोबत माझी तोंडातोंडी झाली त्या व्यतिरिक्त काही घडले नाही. त्यामुळे मी रागाच्या भरात आरोपीविरुद्ध फिर्याद दिली. आता मला माझी लेखी तक्रार तेच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही. लेखी तक्रार वरील सहीला **नि.क्र.२९** देण्यात येते. आता मला प्रथम छापील खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला आठवत नाही. प्रथम छापील खबर अहवाला वरील सहीला **नि.क्र.३०** देण्यात येते.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. आता मला माझ्या लेखी तक्रार व प्रथम छापील खबर अहवाल यामधील अधोरेखीत भाग "अ'' व "ब'' वाचून दाखविण्यात आले तसे काही घडले नव्हते. पोलिसांनी तसे माझ्या लेखी तक्रार/बयान का लिहून घेतले ते मला आठवत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा आरोपीसोबत न्यायालयाच्या बाहेर समाझोता झालेला आहे. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी माझा नातेवाईक आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सोबत माझा समझोता झाल्याने मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री नागोशे यांचे मार्फत</u>**

३. माझे आरोपींसोबत संबंध चांगले आहे. हे म्हणणे खरे आहे की, आता माझा आरोपीसोबत वाद मिटला आहे त्यामुळे मला आता ही केस चालविणे नाही.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १२.०३.२०२६.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.